# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


**प्रेसनोट क्र.६१० दिनांक २४.०७.२०२०**

## बोईसर पोलीस ठाणे येथे दाखल खुनाच्या गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्यात बोईसर पोलीसांना यश.

माहे फेब्रुवारी २०१९ ००.०० ते दिनांक १९/०७/२०२० रोजी १८.०० वाजता फिर्यादी यांचे भाडेकरु आरोपीत यांनी अपसात संगनमत करुन मयत हिने त्यांचे विरुध्द दिलेली तक्रार मागे घ्यावी याकरिता तिला नियमितपणे मारहाण करुन व भांडण करुन तिस कशाने तरी जिवे ठार मारुन तिचे प्रेत प्लॅस्टिकचे निळे ड्रममध्ये कोबुंन पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने ड्रम संडास बाथरुमचे पोठमाळयावर लपवुन ठेवला म्हणुन बोईसर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. २३४/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०२,२०१,३४ प्रमाणे दिनांक १९/०७/२०२० रोजी २२.०४ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपीत यांनी गुन्हा घडवुन आणुन मयताचे प्रेत ५० ते ६० लीटर क्षमतेच्या प्लॅस्टीकच्या ड्रममध्ये कोंबुन ड्रमला वरुन घट्ट झाकण लावुन सदरचा ड्रम घरातील संडास बाथरुमच्या पोटामाळयावर दडवुन ठेऊन आपला उद्देश साध्य करण्यासाठी पुरावा नष्ट करुन घरास बाहेरुन कुलूप लावुन सुमारे फेब्रुवारी २०१९ पासुन आपले अस्तित्व लपवुन राहत होते. तसेच घरमालक यास नियमीतपणे भाडे ऑनलाईन पाठवित होते. गुन्हयाचे प्राथमिक तपासात निष्पन्न हकीकतीवरुन आरोपीतांची माहिती मिळाल्याने बोईसर पोलीस ठाणे नेमणुकीतील एक विशेष तपास पथक नेमुण त्यांना हरीयाणा राज्यात रवाना करण्यात आले होते. तपास पथकाने आपले विशेष कौशल्याने स्थानिक पोलीसांचे मदत घेऊन आरोपीत १) पवन गणेश झा, २) बच्चुदेवी पवन झा, ३)दिपक पवन झा, ४) नितु मुकेश ठाकुर यांना ताब्यात घेऊन त्यांना बोईसर पोलीस ठाण्यात आणुन त्यांना दिनांक २३/०४/२०२० रोजी १८.०७ वाजता अटक करण्यात आली असुन सदर आरोपीतांनी खुनाची कबुली दिलेली आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास पोलीस निरीक्षक श्री.प्रदीप कसबे हे करीत आहेत.

सदर गुन्हयाचा तपास श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधिक्षक, पालघर, यांचे सुचनेप्रमाणे श्री. विक्रांत देशमुख, अप्पर पोलीस अधिक्षक, पालघर, श्री. विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी बोईसर यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी बोईसर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक श्री, प्रदिप कसबे, पोउनि/आशिष पाटील, पोहवा/दुसाने, पोशि/जामदार, मपोशि/थोरात यांनी केली आहे.

Scanned with CamScanner